# जनसंपर्क अधिकारी

## पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार

### पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे फोन नं ०२२- २९४५१००१

Email ID – pro.cp.mb-v@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्र. १३-२०२२** **दिनांक ११/०१/२०२२**

## सराईत गुन्हेगारांस अटक, जबरीने सोनसाखळी चोरी चे ०८ आणि मोटारसायकल चोरीचे ०४ असे एकुण १२ गुन्हे ऊघडकीस एकुण ८,८०,०००/- रुपयांचा मुद्देमाल हस्तगत

**हकिगत :-**

दिनांक १२/१२/२०२१ रोजी सकाळी ०५:४० वा. च्या सुमारास विरार पुर्वेकडील गुरुदत्त नगरच्या रस्त्यावर पायी चालत जाणाया महिलेच्या गळ्यातील ०८ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र तीच्या पाठीमागून मोटारसायकलवरुन आलेल्या एका अनोळखी चोरट्याने जबरीने खेचून पळून गेल्याबाबत यातील फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र. १२३३/२०२१, भा.दं.वि.सं. कलम ३९२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. तसेच गुन्ह्याच्या तपासादरम्यान त्याच आरोपीने साथीदारांसह वसई आणि नालासोपारा परीसरातही जबरीने सोनसाखळी चोरी केल्याचे निष्पन्न झाले होते.

**गुन्ह्याची ऊकल :-**

सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान गुन्हयाचे घटनास्थळावरील प्राप्त सि.सि.टी.व्ही फुटेज, आरोपींची गुन्हा करण्याची कार्यपध्दती वरुन सदरचा आरोपी हा विरार पोलीस ठाणे अभिलेखावरील सराईत सोनसाखळी चोर असल्याचे निष्पन्न झाले. आरोपी कोणाच्याही संपर्कात नसल्याने तसेच तो राहण्याची जागा वारंवार बदलत असल्याने त्याचा मागोवा घेणे कठिण झाले होते. त्यामुळे बातमीदारांना आरोपीची माहिती घेण्याचे सांगण्यात आले होते. त्याप्रमाणे बातमीदाराने गुन्ह्यातील आरोपी मागील दोन महिन्यांपासून सातपाटी येथे पत्नीसोबत भाडेतत्वावर राहण्यास असल्याची माहिती दिली. त्यानंतर सापळा रचुन आरोपीला ताब्यात घेण्यात आले. त्याच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासामध्ये त्याचा गुन्ह्यातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करण्यात आली.

**आरोपीची गुन्हा करण्याची कार्यपध्दती :-**

यातील अटक आरोपी विरार पोलीस ठाणे अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. पहाटेच्या वेळी पोलीस आयुक्तालयातील वसई आणि नालासोपारा पोलीस ठाण्याच्या हद्दिमध्ये पायी चालणाया महिलांच्या गळ्यातील दागीणे जबरीने चोरुन पळून जाणे.

**अटक आरोपी :**

अजय किरण शहा, वय २२ वर्षे, रा. गवारी चाळ, बरफ पाडा, विरार (पु.), ता. वसई, जिल्हा पालघर

**हस्तगत मुद्देमाल**

१) ५,२०,०००/- रुपये किमतीचे १०४ ग्रॅम वजनाच्या एकुण ०८ सोन्याच्या चैन व मंगळसुत्र

२) ३,६०,०००/- रुपये किमतीच्या ०६ मोटारसायकल

-------------------

८,८०,०००/- रुपये एकुण

**<u>ऊघडकीस आलेले गुन्हे :-</u>**

| | |
|---|---|
| १. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र १२३३/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२ |
| २. | तुळींजं पोलीस ठाणे गु.नों.र.क्र १४९७/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ |
| ३. | तुळींज पोलीस ठाणे गु.नों.र.क्र १४४४/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ |
| ४. | तुळींज पोलीस ठाणे गु.नों.र.क्र १४६७/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२ |
| ५. | माणिकपूर पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ४६०/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ |
| ६. | अर्नाळा पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ३८९/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ |
| ७. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र १३१५/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३७९ |
| ८. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ८५७/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३७९ |
| ९. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र १२८०/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३७९ |
| १०. | तुळींज पोलीस ठाणे गु.नों.र.क्र १३१७/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३७९ |
| ११. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ७५४/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ (पाहीजे आरोपी) |
| १२. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ७६२/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ (पाहीजे आरोपी) |
| १३. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ९७६/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ (पाहीजे आरोपी) |
| १४. | विरार पोलीस ठाणे गु.नों.र.क्र ९८२/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ (पाहीजे आरोपी) |
| १५. | तुळींज पोलीस ठाणे गु.नों.र.क्र १३०४/२०२१, भा.दं.वि.सं कलम ३९२, ३४ (पाहीजे आरोपी) |

सदरची कामगीरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, श्री. रामचंद्र देशमुख सहाय्यक पोलीस आयुक्त, श्री. सुरेश वराडे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. दिलीप राख पोलीस निरीक्षक (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे प्रकटीकरण शाखेतील पोलीस उप निरीक्षक अभिजीत भुपेंद्र टेलर, संदेश राणे, पो.हवा. सचिन लोखंडे, पो.ना. हर्षद चव्हाण, संदिप शेरमाळे, पो.शि. इंद्रनिल पाटील, विशाल लोहार, रवी वानखेडे, सुनिल पाटील, सागर घुगरकर, युवराज वाघमोडे यांनी केली आहे.

*********